# नियमित दिवाणी दावा क्र.३६३/२०२१ मधील नि.क्र.५ वर आदेश

## (प्रसाद अशोक चव्हाण वगैरे विरुध्द महाराष्ट्र शासन वगैरे )

## (CNR NO.MHSN02-0023732021)

१. वादी यांनी प्रतिवादीविरुध्द ठरावाकरीता व निरंतर ताकिदीकरीता मुळ दावा दाखल केलेला आहे. त्यामध्ये प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी दावा मिळकतीतून गेलेल्या रस्त्याचे कोणत्याही प्रकारे रुंदीकरण करु नये व दावा मिळकतीतील कोणताही भाग नव्याने ताब्यात घेवू नये, तसेच दावा मिळकतीतील दुकानांची व पत्र्याच्या शेडची पाडापाड करु नये व वादीच्या शांततामय कब्जेवहीवाटीस हरकत अडथळा करु नये अशा तुर्तातुर्त ताकीदीकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**वादींचे अर्जाविषयची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे :-**

२. मौजे जत, तालुका जत येथील गट क्र.४६९/अ/१ क्षेत्र १ हेक्टर ७१.५० आर ही मिळकत व त्या मिळकतीमधील पत्र्याचे शेड व रस्ता हा मुळ दाव्याचा व तक्रार अर्जाचा विषय आहे.

३. दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र.६ यांच्या मालकी कब्जेवहीवाटीची आहे. सदरहु मिळकतीमधील ०३.३४ ही मिळकत प्रतिवादी यांच्या मालकीची व उर्वरीत मिळकत वादी यांच्या मालकीची आहे.

४. वादींच्या म्हणण्याप्रमाणे सदरहु मिळकतीतून व लगतच्या मिळकतीमधून फार पूर्वीच रस्ता गेलेला आहे. त्याचे क्षेत्रफळ ५२ आर इतके आहे. वादींच्या म्हणण्याप्रमाणे त्यांची जी जमिन रस्त्यात गेलेली आहे, त्याबाबत त्यांना नुकसान भरपाई मिळालेली नाही.

५. वादींच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीमधून जे दोन रस्ते यापूर्वी गेलेले

आहेत, ते रुंद करण्याचा घाट प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी बेकायदेशीररित्या घातलेला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्र.३ ते ५ हे दिनांक १९/११/२०२१ रोजी दावा मिळकतीमध्ये रस्त्याची मोजणी करण्यासाठी आलेले होते. त्याबाबत त्यांना त्यांनी विचारले असता ते रस्त्याची रुंदी वाढविणार आहेत व त्यास जिल्हाधिकारी, सांगली व तहसिलदार, जत यांनी परवागनी दिलेली आहे, तसेच तुमची रस्ता रुंदीकरणातील पत्र्याची शेड काढून घ्या असे प्रतिवादींनी त्यांना सांगितले.

६. त्यामुळे वादींच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्र.३ ते ५ हे त्यांच्या गट क्र. ४६९/अ/१ या मिळकतीमधून व लगतच्या मिळकतीमधून जाणा–या रस्त्याची रुंदी वाढविण्याची कृती बेकायदेशीररित्या करुन वादीच्या शांततामय कब्जेवहीवाटीस हरकत अडथळा करण्याचा प्रयत्न करण्याच्या विचारात आहेत. तसेच त्यांच्या म्हणण्याप्रमाणे रस्त्याचे रुंदीकरण होण्याच्या दृष्टीने प्रतिवादी हे वादीची दावा मिळकतीतील दुकाने व पत्र्याची शेड पाडण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी वादींच्या सुरळीत कब्जेवहीवाटीस हरकत अडथळे करु नयेत, रस्त्याचे रुंदीकरण करु नये व वादींची दुकाने व पत्र्याचे शेड पाडू नये अशी तुर्तातुर्त ताकीद मिळणेकरीता वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

७. सदरहु अर्जाला अनुसरुन प्रतिवादी क्र.५ यांनी त्यांचे विस्तृत म्हणणे व कैफियत नि.क्र.३६ कडे दाखल केलेले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वादींच्या अर्जातील सर्व कथने ही पुर्णपणे खोटी, खोडसाळ असुन ती त्यांना मान्य नाहीत. तसेच प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे वादी यांनी ज्या रस्त्याबाबत तक्रार उपस्थित केलेली आहे, त्याची लांबी–रुंदी अर्जात नमूद केलेली नाही. त्यामुळे वादींनी दाव्यामध्ये तक्रार विषयक रस्त्याचे योग्य वर्णन केलेले नसल्यामुळे वादींचा अर्ज चालण्यास पात्र नाही अशी स्पष्ट हरकत प्रतिवादी यांनी उपस्थीत केलेली आहे.

८. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे तथाकथीत सर्वे नं.४६९/अ/१ या मिळकतीमधून जो रस्ता गेलेला आहे तो रस्ता सन १९८१–२००१ रस्ते विकास योजनेमध्ये समाविष्ठ झालेला आहे. त्यामुळे तो रस्ता तेव्हापासून अस्तीत्वात आहे. तसेच सदरचा रस्ता प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून सन २००६ मध्ये विकसित करण्यात आलेला होता व आहे. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मंजूर असलेल्या कुठल्याही रस्त्याला जमिन अधिग्रहण करुन त्याचा मोबदला देण्याची तरतुद नाही.

९. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे वादी व त्यांचे पुर्वहक्कदार यांनी कायदा व नियम धाब्यावर बसवून गट क्रमांक ४६९/अ/१ मध्ये घर बांधत असल्याचे भासवून जत– मल्याळ या जिल्हा परिषदेच्या मालकीच्या रस्त्यावर रस्त्याच्या मध्यभागापासून १० मीटरच्या आत दुकान गाळे, पत्रा शेड व घराचे बांधकाम करुन अतिक्रमण केलेले आहे. वादींप्रमाणेच अन्य व्यक्तींनी देखील अशा प्रकारे अतिक्रमण केल्याने अतिक्रमण निर्मुलन उप अभियंता, पंचायत समिती, जत यांनी सन २०२० पासून वेळोवेळी संबंधीताना नोटीस देवून अतिक्रमण काढण्याबाबत कळविले होते. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे अशा प्रकारची नोटीस वादी यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी सदरचा अप्रामाणिकपणाचा, खोटा, खोडसाळ दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे वादी हा मे. कोर्टासमोर प्रामाणिकपणे आलेला नाही व त्याचा अर्ज सदभावनेचा नाही. सबब त्यांनी वादींचा अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे.

१०. वादी–प्रतिवादी क्र.५ यांच्या परस्परविरोधी कथनांवरुन पुढील मुद्दे विचारार्थ घेतले. त्यांचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी यांनी प्रथमदर्शनी केस शाबीत केली आहे काय ? | .. **नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| २. | न्यायाची तुला वादी यांच्या बाजूने आहे ही बाब वादी यांनी शाबीत केली आहे काय ? | **.. नकारार्थी.** |
| ३. | तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज मंजुर केल्यास कोणास अधिक नुकसानीस सामोरे जावे लागेल ? | **.. प्रतिवादी यांना** |
| ४. | कोणता आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत** :-

११. सदरहु अर्जाला अनुषंगून वादी यांनी दाखल केलेल्या मुळ दाव्याचे व दावा मिळकती संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केले. त्याचा उल्लेख योग्य त्या ठिकाणी करण्यात येतो.

१२. सदरहु अर्ज हा तुर्तातुर्त ताकीदीचा असल्यामुळे केसचे गुणदोषावर विस्तृतपणे ऊहापोह करणे जरुरीचे नाही. तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज विचारात घेत असताना प्रथमदर्शनी केस कोणाचे बाजूने आहे व अर्ज मंजूर केल्यास कोणाचे मोठया प्रमाणावर नुकसान होईल इतकी मर्यादीत बाब विचारात घेणे जरुरीचे असते.

१३. परंतु प्रस्तुत केसमधील अत्यंत महत्वपूर्ण बाब म्हणजे वादी यांच्या मूळ दाव्यातील मागणी व नि. ५ कडिल तुर्तातुर्त ताकिद अर्जातील मागणी ही सर्वसाधारणपणे एकच आहे. त्यामुळे अशा प्रकारे ताकीद अर्ज विचारात घेत असताना कागदपत्रांची छाननी बारकाईने होणे गरजेचे आहे.

१४. वादी यांच्या तक्रार अर्जाला अनुषंगून गट क्रमांक ४६९/अ/१ या ७/१२ उता-याचे अवलोकन केले. मिळकतीच्या भोगवटादार सदरी वादी क्र.१ ते ३ व प्रतिवादी क्र.६ यांची नावे भोगवटादार मालक म्हणून दिसून येतात. वादींच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीमधून दोन रस्ते गेलेले आहेत व त्या रस्त्याचे सर्वसाधारण

क्षेत्रफळ ५२ आर इतके आहे. वादींच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्र.३ ते ५ हे दिनांक १९/११/२०२१ रोजी दावा मिळकतीमध्ये रस्त्याचे रुंदीकरण करायचे आहे, त्यामुळे त्यांनी त्या रस्त्याच्या रुंदीकरणात येणारे त्यांचे पत्याचे शेड काढून घ्यावे, अशी त्यांना धमकी वजा सुचना दिल्याचे नमूद केलेले आहे.

१५. अत्यंत महत्वाची व विचार करण्यासारखी बाब म्हणजे वादींच्याच म्हणण्याप्रमाणे गट क्रमांक ४६९/अ/१ या त्यांच्या मिळकतीमधून दोन रस्ते गेलेले आहेत व त्याचे क्षेत्रफळ ५२ आर आहे.

प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे सदरचे रस्ते हे सन १९८१ सालापूर्वीपासूनचे आहेत व ते रस्ते पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून विकसित करण्यात येतात. अशा प्रकारे दावा मिळकतीमधून रस्ता जातो असे म्हणणे वादी–प्रतिवादी या दोघांचेही असल्याने तथाकथीत रस्त्याबाबत संशय घेण्याचे कोणतेही कारण नाही.

१६. अशा परिस्थीतीत वादींच्याच म्हणण्याप्रमाणे त्यांच्या मिळकतीमधून ५२ आर क्षेत्रफळामधून रस्ता जात असल्यामुळे, त्यांची रस्त्यात जात नसणारी मिळकत कोणती, हे वादी यांनी सुस्पष्टपणे चतुःसिमापुर्वक कथन करणे अत्यंत आवश्यक होते. परंतु वादी यांनी त्यांच्या ज्या मिळकतीमधून रस्ता जात नाही ती मिळकत नक्की कोणती याबाबतची वस्तुस्थिती रेकॉर्डवर फोटोग्राफ्सच्या माध्यमातून अगर नकाशाच्या माध्यमातून सादर केल्याचे दिसून येत नाही.

१७. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे गट क्र.४६९/अ/१ या मिळकती मधून जो शासकीय रस्ता जातो, तो रस्ता प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मंजूर रस्ता आहे व तो वेळोवेळी विकसित करण्यात येतो. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे वादींच्या मिळकतीमधून फार पूर्वीच रस्ता गेलेला असल्यामुळे त्यांना नुकसान भरपाई मिळालेली

नाही अशी वादींनी तक्रार केलेली आहे ती स्वीकारण्यायोग्य नाही. उलटपक्षी प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे जो रस्ता पूर्वापारचा अस्तीत्वात आहे, त्या रस्त्यामध्ये वादी हे दुकान गाळे व पत्रा शेड बांधून अतिक्रमण करत आहेत. त्यामुळे वादींनी शासनाच्या ग्रामसडक योजनेमध्ये अतिक्रमण करुन जे रस्त्यामध्ये अडथळे करण्याचा प्रयत्न केलेला आहे ते अडथळे दुर करण्यासंदर्भात प्रतिवादी यांनी २०२० पासून वादींविरुध्द कारवाया चालू केलेल्या होत्या. त्यामुळे त्या कारवायांना कटशह देण्यासाठी वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे, असे आक्रमक प्रतिपादन प्रतिवादी यांनी केलेले आहे.

१८. निश्चितच वादी यांच्या मिळकतीमधून सुमारे ५२ आर इतका रस्ता गेलेला आहे असे वादीचेच म्हणणे आहे. तसेच तो रस्ता हा ग्राममार्ग क्रमांक १७ जत–मल्याळ हा जिल्हा परिषद, पंचायत समिती यांच्या मालकीचा आहे व त्यामध्ये वादी हे अतिक्रमण करुन दुकान गाळे व पत्राशेड करत आहेत, अशी स्पष्ट तक्रार प्रतिवादी यांनी केलेली आहे. ज्यावेळेस वादी हे प्रतिवादी त्यांचे दुकान गाळे व पत्रा शेड पाडण्याची धमकी देत आहेत असे कथन करत आहेत, त्यावेळेस सदरचे दुकान गाळे व पत्राशेड रस्त्यामध्ये कुठे आहेत, अगर रस्त्याच्या कोणत्या बाजुस आहेत, अगर वादींच्या म्हणण्याप्रमाणे रस्त्यात नसेल तर नक्की रस्ता सोडून किती अंतरावर आहेत, याबाबत ठोस मोजमापे नमूद करुन वस्तुस्थितीदर्शक तथाकथीत दुकान गाळयांचे फोटो अथवा माहीती वादी यांनी अर्जासोबत प्रथमदर्शनी पुरावा म्हणून दाखल करणे अपेक्षीत होते.

१९. वादींच्या म्हणण्याप्रमाणे दिनांक १९/११/२०२१ रोजी प्रतिवादी क्र.३ ते ५ हे रस्ता रुंदीकरणाच्या दृष्टीने दावा मिळकतीची मोजमापे घेत होते. अशा परिस्थितीत वादींचे तथाकथीत शेड व दुकान गाळे हे प्रतिवादी क्र.३ ते ५ यांना अभिप्रेत असणा–या रस्ता रुंदकरणामध्ये येत नाहीत हे प्रथमदर्शनी सिध्द करण्याची जबाबदारी ही वादी यांचीच आहे. परंतु प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे वादी हेच सरकारी रस्त्यामध्ये

अतिक्रमण करुन पत्र्याचे शेड व दुकानगाळे बांधत आहेत व त्यासंदर्भात त्यांनी त्यांना नोटीस दिलेली आहे. परंतु संदर्भीय नोटीस वादी यांनी केसकामी सादर केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे वादी हे स्वच्छ हाताने व वस्तुस्थीती नक्की काय आहे हे कोर्टासमोर न आणता प्रतिवादीविरुध्द केवळ ते रस्त्याचे रुंदीकरण करत आहेत म्हणून खोटया तक्रारी करत आहेत हा प्रतिवादी यांनी केलेला युक्तीवाद प्रथमदर्शनी स्वीकारण्यायोग्य वाटतो.

२०. अशा परिस्थितीत दावा मिळकतीमधून पूर्वापार प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्ता गेलेला आहे व त्या रस्त्याची डागडुजी अथवा रस्त्याच्या सुधारणा वेळोवेळी केल्या जात आहेत असे प्रतिवादींच्या म्हणण्यावरुन प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच दावा मिळकतीमधून रस्ता गेलेला आहे याबाबत वादी यांचे सकारात्मक म्हणणे आहे. किंबहुना सदरचा रस्ता हा सुमारे ५२ आर इतक्या क्षेत्रफळामधून गेलेला आहे असे देखील वादी यांचे म्हणणे आहे. अशा परिस्थितीत वादींच्या मिळकतीमधून रस्ता गेलेला असेल व तो रस्ता प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत विकसित केला जात असेल तर सदरचा रस्ता सोडून वादी यांच्या मालकीची नक्की कोणती मिळकत आहे, हे वादी यांनी स्पष्ट नकाशाद्वारे व कागदपत्रांद्वारे पुराव्याकामी दाखल करणे आवश्यक बाब होती. परंतु वादी यांनी त्यांच्या ताब्यात रस्ता सोडून कोणती मिळकत आहे याबाबतचे कोणतेही पुरावे प्रथमदर्शनी सादर केलेले नाहीत. त्यामुळे प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे जर त्यांच्या रस्ता रुंदीकरणाच्या मार्गामध्ये वादी यांचे पत्र्याचे शेड व दुकान गाळे येत असतील तर तथाकथीत अतिक्रमण काढण्यापासून प्रतिवादी यांना प्रतिरोधीत करणे योग्य होणार नाही. अशा प्रकारे जर दावा मिळकतीमधून जाणा–या रस्त्याच्या आजुबाजुला वादी यांनी नियमाप्रमाणे जागा न सोडता दुकानगाळे अगर बांधकाम केलेले असेल तर सदरचे बांधकाम हे अतिक्रमीत बांधकाम म्हणून जर प्रतिवादी हे पाडण्याची कारवाई करत

असतील तर त्या कारवाईमध्ये कोर्टाने हस्तक्षेप करण्याचे कोणतेही कारण नाही.

२१. अशा परिस्थीतीत दावा मिळकतीत वादी यांची पत्र्याची शेड व दुकान गाळे नक्की कुठे आहेत याबाबत वस्तुस्थीती दर्शविणारे फोटोग्राफ्स अगर चुतुःसिमा नमूद करुन मिळकतीचे वर्णन वादी यांनी अर्जाचे कामी दाखल केलेले नसल्यामुळे वादींचे तथाकथीत बांधकाम व शेड हे रस्ता रुंदीकरणाला अडथळयाचे ठरत नाहीत असे ठामपणे म्हणता येणार नाही. उलटपक्षी वादींच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी दावा मिळकतीची मोजणी रस्ता रुंदीकरणाच्या दृष्टीने चालू केलेली असल्यामुळे प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये वादीनी अतिक्रमण करुन शेड उभारलेले आहे हा प्रतिवादींनी घेतलेला आक्षेप सकृतदर्शनी दुर्लक्षीत करता येण्यासारखा नाही.

२२. अशा प्रकारे दावा मिळकतीमधून शासकीय रस्ता जातो व त्या रस्त्यामध्ये प्रतिवादी हे रस्ता रुंदीकरणाचे काम करत असताना वादी हेच अतिक्रमण करुन अडथळे करण्याचा प्रयत्न करत आहेत हा प्रतिवादी यांनी घेतलेला आक्षेप प्रथमदर्शनी स्वीकारण्या योग्य वाटतो. त्यामुळे प्रतिवादी करत असलेल्या रस्ता रुंदीकरणाच्या शासकीय कामात कोर्टाने हस्तक्षेप करण्याचे कोणतेही कारण नाही. तसेच प्रतिवादी हे वादींच्या मिळकतीमध्ये बेकायदेशीरपणे येवून रस्ता रुंदीकरण करत आहेत इतपत प्रथमदर्शनी केस वादी यांना शाबीत करता आलेली नाही. त्यामुळे प्रतिवादीविरुध्द त्यांनी शेडचे बांधकाम पाडू नये अथवा दुकान गाळे पाडू नयेत असा तुर्तातुर्त ताकीदीचा अनुतोष मिळविणेस वादी प्रथमदर्शनी हक्कदार ठरत नाहीत. त्यामुळे वादी यांना प्रथमदर्शनी केस शाबीत करता आलेली नाही. तसेच न्यायाची तुला देखिल वादी यांच्या लाभात नाही, सबब मुद्दा क्र.१ व २ चा निष्कर्श नकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ बाबत</u> :–**

२३. मुद्दा क्र.१ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात आलेले आहेत. वादी

यांना प्रथमदर्शनी केस शाबीत करता आलेली नाही. निश्चितच दावा मिळकतीमधून प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत पुर्वापारचा रस्ता आहे असे वादी–प्रतिवादी यांच्या कथनांवरुन स्पष्ट होत आहे. सदरच्या रस्त्याचे रुंदीकरण व रस्त्याची डागडुजी ही ग्रामसडक योजने अंतर्गत वेळोवेळी केली जाते असे प्रतिवादींचे म्हणणे आहे. तसेच सदरहु रस्ता रुंदीकरणाचे काम प्रतिवादीमार्फत चालू आहे असे देखील प्रतिवादींचे म्हणणे आहे. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीमधून जो रस्ता जात आहे त्या रस्त्याच्या मध्यभागापासून जेवढे अंतर वादी यांनी सोडणे अभिप्रेत होते तेवढे अंतर न सोडता वादी यांनी पत्र्याचे शेड व दुकान गाळे रस्त्याच्या बाजुला बांधलेले आहेत व ते काढण्यासंदर्भात प्रतिवादी यांनी वादी यांना नोटीस दिलेली आहे. त्यामुळे जर सदरचे दुकान गाळे व पत्र्याचे शेड दावा मिळकतीमधून हटविले नाही अगर दुर केले गेले नाही तर रस्त्याचे रुंदीकरण योग्य पध्दतीने होवू शकणार नाही. निश्चितच त्यामुळे वाहतुक कोंडी होवू शकेल. शासनाचा रस्ता रुंदीकरणाचा मुळ उद्देश वाहतुक सुलभतेने व योग्य करणे असा असतो. सदरहु रस्त्याच्या डागडुजीसाठी दरवेळेस मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध केला जातो. अशा विकासकामात जर प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे वादी हे अतिक्रमण करुन अडथळे निर्माण करत असतील तर ते अडथळे दुर करण्यापासून प्रतिवादी यांना प्रतिरोधीत केले तर शासन त्यांचे रस्त्यासंदर्भातील विकास काम पुर्ण करु शकणार नाही. त्यामुळे जर वादींचे अतिक्रमण काढण्यास प्रतिवादी यांना प्रतिरोधीत केले तर रस्ता हा योग्य वेळेत पुर्ण होवू शकणार नाही हा प्रतिवादी यांनी घेतलेला आक्षेप पटण्यासारखा वाटतो. त्यामुळे जर तुर्तातुर्त ताकीदीचा हुकूम वादी यांच्या लाभात पारीत केला तर प्रतिवादी यांना अधिक गैरसोईस सामोरे जावे लागेल असे मला वाटते. सबब, मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष प्रतिवादी यांच्या लाभात नोंदविण्यात येतो.

२४. सबब, मुद्दा क्र. १ ते ३ चा साकल्याने विचार करता, नि.५ कडील वादींचा

तुर्तातुर्त ताकिद अर्ज फेटाळणे क्रमप्राप्त ठरते. सबब आदेश खालीलप्रमाणे.

## आदेश

१. वादी यांचा नि.क्र.५ चा तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज फेटाळण्यात येत आहे.

२. सदर आदेशाची वादी व प्रतिवादी यांनी नोंद घ्यावी.

३. अर्जाचे स्वरुप पाहता खर्चाबद्दल आदेश नाही.

(आदेश खुल्या न्यायालयसमोर घोषीत )

Abhay Ashok Mehendale
Digitally signed by Abhay Ashok Mehendale
Date: 2022.03.16 11:54:00 +0530

**ठिकाण : सांगली.** **( अ. अ. मेहेंदळे )**
**दिनांक :१५.०३.२०२२** **तिसरे सह दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,सांगली.**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | - | तिसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | - | १५/०३/२०२२ |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक- | | १६/०३/२०२२ |